सौ . उषा प्रभुणे
'चिंतामणी' बंगला श्री नगर कॉलनी,
उदगीर ४१३ ५१७ जि . लातूर .
फोन: ०२३८५-२५७४२२
usha_prabhune@yahoo.com

# मनात कोरली गेलेली अमेरिकन माणसे

पहिले मराठी विश्व साहित्य संमेलन अमेरिकेत होते आहे ही आनंदाची गोष्ट आहे . ज्या अमेरिकेत हे संमेलन घेण्याचे ठरवले त्या अमेरिकेत मराठी माणूस किती तरी वर्षापासून राहतो आहे . अमेरिकन माणसाला जवळून बघतो आहे . अशी काही अमेरिकन माणसं आमच्याही सहवासात आली . जवळ आली . त्यांविषयी थोडेसे...

आमचा मुलगा उदय १९९५ साली अमेरिकेत शिक्षणासाठी गेला . १९९७ साली एम् . एस् . झाला . मी व हे म्हणजे डॉ . अरुण प्रभुणे त्याच्या कमेन्समेंट सेरेमनीसाठी अमेरिकेत गेलो होतो . हा समारंभ आनंदात साजरा करून व दोन तीन महिने राहून आम्ही भारतात परतणार होतो .

या आमच्या पहिल्या अमेरिकाभेटीत आणि नंतरही काही अमेरिकन व्यक्ती निकट सहवासात आल्या . त्यामुळे अमेरिकन माणसांच्या स्वभावाचे काही पैलू कायमचे मनात कोरले गेले . अमेरिकनांविषयीचे भ्रम दूर झाले . अमेरिकन व्यक्तींमधील कौटुंबिक प्रेमसंबंध, माया, ममता, त्यागवृत्ती, देवविषयक गाढ श्रद्धा, यांचा अनुभव खरोखरच अंतर्मुख करणारा होता . या बाबतचे काही मोजके अनुभव इथे लिहीत आहे .

## अमेरिकन माणसांची त्यागी वृत्ती :

कनेटिकट राज्यातील हार्टफर्ड युनिव्हर्सिटीत उदय शिकला . आम्ही हार्टफर्डला सुमारे साडेतीन महिने होतो . या काळात उदयचा अमेरिकन मित्र 'ॲन्ड्र्यू' सहवासात आला . गप्पा करता करता एकदा तो म्हणाला, " माझ्या बहिणीला कॅन्सर झाला तेव्हाची गोष्ट . आम्ही एकूण सात भावंडे . तीन भाऊ आणि चार बहिणी . आमच्या देशात विभक्त कुटुंबपद्धती असल्याने बहिणीची सेवा करायला मात्र तिच्याजवळ कुणीच नव्हते . आम्हाला वाईट वाटू लागले . पण सर्वच नोकरी करणारे . कुणीच रिकामे नाही . शेवटी आम्ही एका वीकएंडला एकत्र जमलो . विचारविनिमय केला . आमच्यात असे ठरले, की प्रत्येकाने चार चार महिने बहिणीजवळ राहून तिची सेवा करायची . पण कुणालाच सलग इतकी रजा मिळणे शक्य नव्हते . म्हणून मग आम्ही क्रमाक्रमाने सरळ नोकरी सोडून बहिणीजवळ राहायचे ठरवले . चार महिन्याची पाळी संपली की नवी नोकरी शोधायची असे ठरले . जो नोकरी सोडेल त्याचे कुटुंब बाकी भावंडांनी चालवायचे . असे दीड वर्षे आम्ही तिला सांभाळले . तिची सेवा केली . तिला वाचवण्याचा प्रयत्न केला . पण शेवटी दीड वर्षाने ती प्रभू येशूकडे निघून गेली . आम्ही आता सहाच भावंडे

उरलो." असे म्हणून ॲन्ड्रयू रडू लागला. हुंदके देऊ लागला. बहिणीच्या आठवणीने त्याला कासावीस होऊ लगले. प्रभू येशूची तो प्रार्थना करू लागला. डोळे मिटून बहिणीला आठवू लागला.

अमेरिकन कुटुंबातील हे प्रेम व ही माया आम्हाला गलबलवून गेली. कुटुंबातील प्रेमनाती पाहून आम्ही भारावून गेलो. विभक्त कुटुंबातील व्यक्तींची ही त्यागी वृत्ती आम्हाला खूप काही शिकवून गेली. अमेरिकन कुटुंबव्यवस्था कशी मोडकळीस आली आहे यावरचे लेखनही न कळत आठवू लागले.

<u>अमेरिकन माणूस पूर्वजन्मीचा भारतीय !</u> :

हार्टफर्डला असताना एकदा आम्ही एका मॉलमध्ये जात होतो. तेव्हढयात एका अमेरिकन माणसाने आम्हाला थांबवले. माझी साडी पाहून आम्ही भारतीय आहोत हे त्याने ओळखले. नंतर तो आमच्याशी छान गप्पा मारू लागला. तो म्हणाला, "तुम्हाला भेटून खूप आनंद झाला. मागच्या जन्मी मीही भारतीयच होतो !" हे ऐकून आम्ही चक्रावलोच. तो म्हणाला, "माझ्या स्वप्नात किती तरी दिवस एक माणूस यायचा. त्याच्या डोक्यावर चंद्र व गळ्यात नाग दिसायचा. एक गल्ली दिसायची. एक माणूस दिसायचा. केस काढलेला. शेंडी असलेला. पूजा करायला जाताना दिसायचा. मग कधीतरी डोक्यावर चंद्र व गळ्यात नाग असलेला तो माणूस भारतातल्या एका कॅलेंडरवर मला दिसला. मी एका भारतातल्या त्या माणसाला "हा कोण ?" म्हणून विचारले. त्याने 'काशीके भगवान शंकर' म्हणून सांगितले. नंतर मग मला भारतात जाण्याची ओढ लागली. मी काशीला गेलो. मला तो सगळा भाग ओळखीचा वाटू लागू लागला. मग मी माझे घर शोधले. मला कळले की मी मागच्या जन्मी काशीचा ब्राह्मण होतो ! केस काढलेला ! शेंडी असलेला ! आठवणींचा त्रास तीव्र झाला की अजूनही मी भारतात जाऊन माझे घर पाहून येतो." अशा त-हेने बोलून तो माणूस निघून गेला.

भारतात पुनर्जन्मावर ब-यापैकी विश्वास ठेवतात. पण भारताच्या बरोबर विरूद्ध असलेल्या अमेरिकेतही असा माणूस अमेरिकेतही आहे हे पाहून आश्चर्य वाटले. आमचा या कशावरही विश्वास बसला नाही. एक मात्र लक्षात आले की श्रद्धा आणि अंधश्रद्धा जगभर सारख्याच. माणूस सगळीकडे सारखाच. असे असले तरी एक प्रसंग म्हणून मात्र कायमचा लक्षात राहिला. विज्ञाननिष्ठ अमेरिकेची ही ओळखही म्हणूनच मनावर कायमची कोरली गेली.

<u>अमेरिकन माणसाचा ममताळूपणा आणि दिलेला शब्द पाळण्याची वृत्ती</u> :

उदयने इंडियाना प्रांतातील इंडियानापोलिस या गावी सॉफ्टवेअर इंजिनियरची नोकरी स्वीकारली. आतापर्यंत उदय जरी अमेरिकेत होता तरी भारतातल्या मुलांबरोबरच होता. आम्हाला तेव्हा त्याची काळजी नव्हती. अमेरिकन लोकांशी त्याचा कमीतकमी सबंध येणार होता. आता मात्र इंडियानात तो एकटाच रहाणार होता. या भागात अमेरिकन गोरे लोक मोठया प्रमाणावर राहतात. आणि त्यामुळेच आम्हाला आता त्याची काळजी वाटू लागली. मुले बाहेरच्या जगात गेली की त्या देशातील मुलींबरोबरच लग्न करतात व तेथेच राहतात असे ऐकून होतो. एकूण काय? काळजीच काळजी !

आम्ही १९९७ साली त्याच्या कमेन्समेंट सेरिमनीसाठी अमेरिकेत गेलो होतो. कनेटिकट राज्यातील हार्टफर्ड येथे. २-३ महिने राहून व पदवीदान समारंभ आनंदात साजरा करून आम्ही आता भारतात परतणार होतो. इंडियानापोलिसला उदयला नोकरी लागल्याने भारतात परतण्याआधी थोडे दिवसच

राज्य बदलून इंडियाना राज्यात गेलो. इंडियानात आम्हाला जेमतेम आठ दिवसच राहता आले. उदय आता एकटाच राहणार, त्याचे कसे होणार ? म्हणून सारखे रडू येऊ लागले. आमचा दोघांचाही जीव कासावीस होऊ लागला. भारतात परतणे तर भाग होते.

याच सात आठ दिवसात उदयच्या ऑफिसमधल्या लॅरी स्लोकम नांवाच्या सहका-याची व आमची भेट झाली. लॅरी उदयहून बराच मोठा होता. ह्यांच्या वयाचा. खराखुरा अमेरिकन. अमेरिका असे नुसते न म्हणता 'युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका' असाच नेहमी अमेरिकेचा उच्चार करणारा. गोरा अमेरिकन असण्याचा खूप अभिमान असणारा. दिसायलाही पक्का अमेरिकन. खूपच लाल गोरा. उंच. धिप्पाड. स्थूल. चष्मा लावणारा. प्रेमळ डोळयांचा. शांत प्रकृतीचा. संथ हालचाली करणारा. हसतमुख. समोरच्या व्यक्तीवर सहज छाप पडेल अशा व्यक्तिमत्त्वाचा. थोडी ओळख झाल्यावर उदयने आम्ही भारतात यायच्या आधी त्याला आणि त्याच्या बायकोला म्हणजे मार्गारिटला घरी जेवायला बोलावले. आमच्या घरी त्यावेळेस काहीच सामान नव्हते. साध्या खुर्च्यासुद्धा नव्हत्या. लॅरी पतिपत्नी घरी येणार म्हणून मग घाईघाईत जाऊन प्लॅस्टिकच्या सहा खुर्च्या आणल्या. त्याला आम्ही असा निरोप दिला की, "आमच्याकडे डायनिंग टेबल नाही, डायनिंग टेबलच्या खुर्च्याही नाहीत. आहेत साध्या प्लॅस्टिकच्या खुर्च्या. तुला हातात ताट घेऊन जेवावे लागेल." तेव्हा तो उदयला म्हणाला, "तू काळजी करू नकोस."

उदयने त्यांना संध्याकाळी सातची वेळ दिली होती. आम्हाला वाटले आपण जरी सात म्हटले तरी आठपर्यत तो येईल. निदान साडे सात तरी त्याला होतीलच. तरी वेळेत मी सगळी तयारी केली. फक्त मी स्वतःच तयार झाले नव्हते. हुश्य ऽऽ करून मी बसणार तोच बरोबर सातच्या ठोक्याला मोठी गाडी दारात थांबली. उदयने मला सावध केले आणि तो त्यांचे स्वागत करायला निघाला. तोपर्यंत त्या दोघांनी घडीचे टेबल आत आणून मांडून देखील ठेवले ! हे पाहून आम्ही चक्रावूनच गेलो ! आपल्याकडे यजमानाकडे जसे असेल ते आपण मान्य करतो. येथे मात्र हा आपली स्वतःची सोय व्हावी म्हणून कारमध्ये चक्क टेबलच घालून आणतो !

अमेरिकन माणसाला गैरसोय मुळीच खपत नाही. दिलेल्या वेळेची मर्यादा ओलांडायला आवडत नाही. समोरच्या माणसाकडूनही त्याची तशीच अपेक्षा असते. अमेरिकन लोकांचे हे दोन स्वभावविशेष लॅरीच्या या पहिल्या भेटीतच कळले. सात म्हणजे सात. नंतर मी पटकन तयार होऊन त्यांचे स्वागत करायला गेले. लॅरीप्रमाणेच त्याची बायकोही छानच होती. सुंदर. हसरी. बोलकी. लाल लाल गोरी. उंच. काहीशी आडवी. स्थूल. नवरा बायको अगदी परस्परांना अनुरूप होते. दोघेही आनंदाने जेवले. माझा स्वयंपाक आवडला. शाकाहारी जेवणालाही मनापासून पसंती दिली. शेवयांची खीर आवडीने खाल्ली. मजा आली.

गप्पा मारून घरी जायला निघाले. तेव्हा मला रडायला आले. त्यांना आधी कळेचना की मी का रडते आहे ! उदयची काळजी वाटते म्हटल्यावर मार्गारिटने मला शांत केले. जवळ घेऊन म्हणाली, "तू उदयची काळजी करू नकोस. मीच त्याची इथली आई आहे असे समज. त्याला काय हवे नको ते मी सगळे पाहीन." ह्यांनाही कासावीस होत होते. डोळे पाणावत होते. लॅरीने ह्यांच्या खांद्यावर हात ठेवला. म्हणाला, "काळजी करू नकोस. आम्हीच त्याचे इथले आई वडील. त्याची सगळी काळजी घेऊ. शांत मनाने भारतात जा." असा दिलासा देऊन निघून गेले. आम्हालाही काडीचा आधार मिळाल्यासारखे वाटले.

खरोखरच या अमेरिकन नवरा बायकोने आपले शब्द खरे करून दाखवले. मदर्स डे, फादर्स डे, ख्रिसमस या सारख्या त्यांच्या विशेष दिवसांना व सणांना तर ते त्याला बोलवतच पण उदयकडून आपले सण कळले तर त्या दिवशीही गोड पदार्थ करून खाऊन आपला सण साजरा करीत. उदयलाही प्रेमाने खाऊ घालीत. तिने उदयचे घर अगदी स्वतः पडद्याचे कापड आणून शिवून ते दारांना आणि खिडक्यांना लावून सजवून दिले. अमेरिकन माणसांचा हा ममताळूपणा आमचे मन हेलावून गेला. दिलेला शब्द पाळण्याची अमेरिकनांची वृत्ती विचारात पाडून गेली.

<u>चर्चमधील अनुभव</u> :

याच लॅरीने एका रविवारी आम्हाला चर्चमध्ये नेले. आम्ही पहिल्यांदाच चर्च पाहिले. त्याने आम्हाला पूर्ण चर्च फिरून दाखवले. तो तेथे प्रार्थनेच्या वेळी ऑर्गन वाजवी. आम्ही त्यांचे पूर्ण भक्तीने व तल्लीनतेने प्रार्थना म्हणणे ऐकले. नंतर तेथे जमलेले लोक प्रभूजवळ त्यांच्या हातून घडलेल्या चुकांची क्षमा मागू लागले. काही जण आपण संकटात सापडलो तेव्हा प्रभू येशूने त्यांना त्या संकटातून कसे सोडवले ते सांगू लागले.

चर्चमधील स्टेजवर एक आंघोळीच्या टबसारखी ठेवलेली मोठी वस्तूही दिसत होती. प्रार्थना व 'पापाची कबुली देणे' हे संपल्यावर स्टेजवर साधारण सात महिन्यांची गर्भारशी आली. फादरजवळ उभी राहिली. आता ही काय बोलणार याची आम्हाला उत्सुकता होती पण काही कळायच्या आत फादरने तिला पाण्यात उतरायला लावले आणि सरळ पाण्याने भरलेल्या टबमध्ये बुचकळून काढले! ती बाई शहारून जाऊन उभी राहिली ! आम्ही थक्क होऊन बघतच राहिलो. हे काय केले ते काहीच कळेना.

सर्व प्रार्थनाविधी संपल्यावर ह्यांनी फादरला या बाबत विचारले. फादर म्हणाला, "ही बाई मूळची आमच्या पंथाची. नंतर या बाईने आमचा हा पंथ सोडून दुसरा पंथ स्विकारला पण तिला परत पहिल्याच पंथात यायचे होते. यामुळे तिला शुद्ध करून घेणे आवश्यक होते. म्हणून पवित्र पाण्याने भरून ठेवलेल्या टबमध्ये तिला बुचकळून काढले आणि शुद्ध करून घेतले.

आम्हाला काय बोलावे ते कळेना. अत्याधुनिक अमेरिकन माणसाचे हे रूप आम्हाला नवे होते. कधीही न विसरता येण्यासारखे होते.

<u>भावनाशील अमेरिकन</u> :

उदयचे १९९९ साली लग्न झाले. तो अमेरिकेत असताना आम्ही उदयसाठी भारतात मुली पाहतोय, पसंत करतोय याचे लॅरी व मार्गारिट यांना कमालीचे आश्चर्य वाटे. त्याचवर्षी आमचा लहान मुलगा सत्यव्रतही अमेरिकेला उदयबरोबर एकाच घरात राहत होता. आता लग्न झाल्यावरसुद्धा तिघेही एकत्रच राहतात हे पाहून ते तोंडात बोटेच घालीत. उदयचे लग्न झाल्यावर स्वतःच्या खर्चाने त्यांनी ऑफीसमधल्या सगळयांना पार्टी दिली.

आमच्या कुटुंबात ते स्लोकम कुटुंबही मिसळून गेले. प्रज्ञा मार्गारिटचे खांदे दुखत आहेत हे पाहून तिचे खांदे दाबून देई. तिला आपले वेगवेगळे पदार्थ खायला घाली. तीही त्यांचे काही पदार्थ करून आम्हाला जेवायला बोलावी. आम्ही पूर्ण शाकाहारी असल्याने त्यांना पदार्थ करावयास मर्यादा पडत पण तशी मार्गारिटची धडपड असे.

लॅरी एवढा पक्का अमेरिकन असूनही कधीच दारू पिताना दिसत नसे. सहवासाने कळले की तो दारू पीतच नसे. लॅरी त्याच्या बायकोचा, त्याच्या मुलींचा, नातवंडाचा फोटो कायम खिशात ठेवी. अजूनही ठेवतो. मार्गारिटला 'हनी' म्हणतो. लग्नानंतर आज चाळीस वर्षानंतरही 'हनी'च म्हणतो. असे हे अमेरिकन आदर्श जोडपे पाहून आनंद वाटतो. अमेरिकेत घटस्फोटांचे प्रमाण प्रचंड असले तरी आमच्या माहितीतली सुखी अमेरिकन जोडपीही पुष्कळ आहेत. असा हा भावनाशील समाज आहे.

अकृत्रिम स्नेह मनाला प्रसन्न करणारा :

इंडियानात असताना अजून एका अमेरिकन जोडीची आणि आमची ओळख झाली. कॅथी आणि रिचर्ड. चाळीसहून अधिक वर्षाचे यशस्वी वैवाहिक जीवन उपभोगणारे जोडपे. सभ्य. सधन. बुद्धिवान. नीटनेटके. दोघेही उत्साही. हौशी. कॅथी अगदी ऐसपैस. व्यवस्थित राहणारी. हे सुद्धा मध्य वयाचे. आमचे व यांचे चांगले संबंध आले आणि आजही टिकून राहिले आहेत. हे दोघेही उदयच्या लग्नाला आवर्जून भारतात आले होते. खूप नवलाईने त्यांनी प्रत्येक कार्यक्रमात भाग घेतला. आम्ही साडी दिली तर ती नेसून लग्नाला आली. वैजापूरसारख्या छोट्या गावात ते आमच्याकडे आले. आम्हाला तेथील रस्त्यांची, तुंबलेल्या नाल्यांची लाज वाटली. आपण त्यांना चांगल्या सोयी उपलब्ध करून देऊ शकलो नाही याचे अतिशय वाईट वाटले. ते मात्र आनंदाने राहिले.

अमेरिकेत त्यांच्या घरी जेव्हा आम्ही गेलो तेव्हा त्यांचे घर पाहून थक्क झालो. अत्यंत प्रशस्त. सुंदर. सिनेमातले असावे तसे. आम्ही शाकाहारी म्हणून तिने खास पदार्थ केले होते. प्रज्ञाने तिला रेसिपी विचारली तेव्हा आम्ही शाकाहारी म्हणून तिने तीन चार पदार्थात फक्त अंडी घातल्याचे कळले. कॅथी अंड्यांना शाकाहारी समजत होती. तिची मेहनत वाया गेलेली पाहून त्यांना आणि आम्हालाही वाईट वाटले. अननसाचा 'पाय' मात्र आम्हाला चालत होता. शेवटी नाराजीने पाय आणि उकडलेल्या बीन्स, उकडलेली मक्याची कणसेच आम्हाला तिने दिली.

रिचर्ड उदयच्या कंपनीत सहकारी होता तर कॅथी गाण्याच्या कार्यक्रमात व्यग्र असे. दोघांनाही अमेरिकन्स इंडियन्स (अमेरिकेचे मूळ रहिवासी) मध्ये काम करण्याची आवड. ह्या आवडीमुळे सध्या ते ह्या लोकांमध्येच न्यू मॅक्सिको या राज्यात राहत आहेत. ह्यांच्या म्हणजे डॉ. अरूण प्रभुणे यांच्या 'नॉर्थ अमेरिकन इंडियन्सच्या अस्वललोकथा'या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाल्याचे कळल्यावर अभिनंदनाबरोबरच कॅथीने ह्यांना एक छोटेसे संगमरवरी अस्वल पाठवले. ते तिला ब-याच वर्षांपूर्वी तिच्या मैत्रिणीने अभिमंत्रित करून दिले होते. योग्य अशा माणसाकडे मी ते आता पाठवत आहे याचा मला आनंद वाटतो आहे असे तिने पत्रात लिहिले होते. कॅथी आणि रिचर्ड्स यांचा हा अकृत्रिम स्नेह मनाला प्रसन्न करणारा आहे.

अमेरिकन संकोची तरुणी :

मुलांनी नोकरीसाठी कॅलिफोर्नियात जायचे ठरवल्यावर सगळ्यांनाच वाईट वाटायला लागले. मग एकत्र जेवणे सुरू झाली. उदयच्या ऑफीसमधले लोकही आले होते. त्यात किम् नावाच्या महिलेबरोबर तिची बहीण लिसा आली होती. ही किम् वयाने पस्तिशीची होती. तिने तिच्यापेक्षा वयस्क असलेल्या माणसाशी दुसरे लग्न केले होते. ती त्या माणसावरोवर म्हटलं तर सुखात होती म्हटलं तर

नाइलाजाने राहत होती. किम् दिसायला चांगली होती. असे असूनही शेवटी समाधान मानून राहत होती.

किम्ची ही कथा तर किम्ची बहीण लिसा एकदाही लग्न करू शकली नव्हती. आम्हाला याचेच आश्चर्य वाटत होते. लिसाला आम्ही याचे कारण विचारले. ती म्हणाली, "आमच्या अमेरिकेत तरुण मुलंमुली मोकळेपणाने एकत्र येतात. पण प्रत्येकाच्या नशिबाने त्याचे लग्न जमतेच असे नाही. माझ्यात कोणालाच इंटरेस्ट वाटला नाही. मी काय करू शकते ?" आम्हाला अतिशय वाईट वाटले. तिला या परिस्थितीमुळे खूप सिगारेट ओढायचे व्यसन लागले होते. किमला तिची काळजी वाटत होती. ती ह्यांना म्हणाली, 'तू प्रोफेसर आहेस. तू मुलांना शिकवतोस. म्हणून तू लिसाला व्यसनातून मुक्त होण्यासाठी उपदेश कर. तिला आहे त्या परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकव.' पण वेळ नव्हता. दिवसही नव्हते. आम्ही काहीच करू शकत नव्हतो. आम्ही तिला म्हणालो, "आमच्या भारतात जन्मवेळेप्रमाणे पत्रिका तयार करून लग्नाचा योग आहे की नाही हे पहाता येते. तुझे पुढचे दिवस कसे असतील तेही कळेल. तुझा विश्वास असेल तर जन्मवेळ सांग. आम्ही भारतात गेल्यावर तुला सगळे कळवू" त्या प्रमाणे आम्ही जन्मवेळ आणली. पण गाव बदलले, विषय बदलले आणि त्यामुळे तो विषय पुढे सरकला नाही. पण यावरून अमेरिकेतही संकोची मुली असतात, त्यांचीही लग्ने होणे अवघड असते हे या निमित्ताने कळले.

अशी अनेक उदाहरणे देता येतील परंतु जागेअभावी थांबते. एक मात्र खरे की एकूण खूप चांगली अमेरिकन माणसे सहवासात आली. ती नेहमीसाठी लक्षात राहिली. मनात कायमचे घर करून राहिली.

- सौ. उषा प्रभुणे
उदगीर
usha_prabhune@yahoo.com
मोबाईल : 9421093177